# Live Test Responce Sheet Details

| | | | |
|---|---|---|---|
| Course Name | : | **Combine Test Series** | **Note** * |
| Subject Name | : | **Sample Paper** | Correct Answer will Carry 1 mark per Question.Incorrect Answer will carry 25.0% Negative Marks. |
| Topic Name | : | **Sample Paper 1** | |
| Test Name | : | **Paper 1** | 1] Options Shown in Green colour with tick are CORRECT. |
| Participant Name | : | **A S** | 2] Chosen option on the right of the question indicates the options selected by the candidate. |
| Your Scored | : | **29.00** | |
| Test Date | : | **15-04-2023** | |
| Test Time | : | **07:20:34 PM - 08:01:52 PM** | |

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **1.00**

**Question No : 1**
खालीलपैकी कोणती **गोदावरीची उपनदी नाही?**

**Answer Options :**
✖ A] इंद्रावती
✖ B] प्रवरा
✔ C] इंद्रायणी
✖ D] दूधना

**Solutions :**
- गोदावरी उगम: त्र्यंबकेश्वर ब्रम्हगिरी (नाशिक) ,महाराष्ट्र लांबी :- 668 km (एकूण लांबी = 1465km)
- गोदावरी खोऱ्याने महाराष्ट्राचे 49% क्षेत्र व्यापले आहे (भारताच्या 10%)
- गोदावरीची सर्वात लांब उपनदी मांजरा होय.
- इंद्रायणी भीमा नदीची उपनदी आहे आणि भीमा कृष्णेची उपनदी आहे.

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **1.00**

**Question No : 2**
महाराष्ट्र निर्मितीच्या वेळी महाराष्ट्रात एकुण अनुक्रमे **किती जिल्हे व प्रशासकीय विभाग** होते?

**Answer Options :**
✖ A] 4, 26
✔ B] 26, 4
✖ C] 16, 6
✖ D] 36, 6

**Solutions :**
- 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र निर्माण झाला त्यावेळी त्यामध्ये एकुण 26 जिल्हे व 229 तालुके होते.
- सध्या महाराष्ट्रात 36 जिल्हे व 6 प्रशासकीय विभाग माहेत

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 3**
जनगणना **2011** प्रमाणे **महाराष्ट्रातील** लोकसंख्या **घनतेनुसार** खालीलपैकी **अचूक** उतरता **क्रम** कोणता ?

**Answer Options :**
✖ A] मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, पुणे, कोल्हापूर
✖ B] मुंबई उपनगर, मुंबई शहर, पुणे, ठाणे, कोल्हापूर
✖ C] मुंबई शहर, मुंबई उपनगर, पुणे, कोल्हापूर, ठाणे
✔ D] मुंबई उपनगर, मुंबई शहर, ठाणे, पुणे, कोल्हापूर

**Solutions :**
- जनगणना 2011 नुसार, महाराष्ट्राची लोकसंख्या घनता दर चौ. कि. मी ला 365 असून राष्ट्रीय स्तरावर घनता 382 आहे.
- महाराष्ट्र लोकसंख्या घनतेनुसार शेवटचे पाच जिल्हे पुढीलप्रमाणे:
- गडचिरोली(74), सिंधुदुर्ग, चंद्रपुर, रत्नागिरी, यवतमाळ

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **1.00**

**Question No : 4**
खालील विधाने अभ्यासून **योग्य विधान / विधाने** निवडा.

अ) कोकणची किनारपट्टी **रिया** प्रकारची किनारपट्टी आहे.
ब) पश्चिमेकडील अरबी समुद्राच्या सखल भागाला **'वलाटी'** तर वलाटीच्या पूर्वेस जो डोंगराळ भाग आहे त्यास **'खलाटी'** असे म्हणतात.

**Answer Options :**
✔ A] फक्त अ
✖ B] फक्त ब
✖ C] अ व ब दोन्ही योग्य
✖ D] अ व ब दोन्ही अयोग्य

**Solutions :**

- **प्रस्तरभंगामुळे कोकण किनारपट्टी तयार झाली.**
- **पश्चिमेकडील अरबी समुद्राच्या सखल भागाला 'खलाटी' ' तर खलाटीच्या पूर्वेस जो डोंगराळ भाग आहे त्यास 'वलाटी' असे म्हणतात.**
- **'वलाटी' या प्रदेशाची साधारण उंची 275 ते 300 मीटर पर्यंत आहे**

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **-0.25**

**Question No : 5**
*योग्य जोडया जुळवा.*

| **किल्ला** | **जिल्हा** |
|---|---|
| अ) कर्नाळा | i) सातारा |
| ब) अजिंक्यतारा | ii) अकोला |
| क) नर्नाळा | iii) रायगड |
| ड) पुरंदर | iv) पुणे |

**Answer Options :**
✔ A] (अ)-(iii), (ब)-(i), (क)-(ii), (ड)-(iv)
✖ B] (अ)-(ii), (ब)-(i), (क)-(iii), (ड)-(iv)
✖ C] (अ)-(i), (ब)-(ii), (क)-(iii), (ड)-(iv)
✖ D] (अ)-(iv), (ब)-(iii), (क)-(ii), (ड)-(i)

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 6**
जोडया जुळवा.

| **लोहपोलाद उद्योग** | **राज्य** |
|---|---|
| (a) रुरकेला | i) तामिळनाडू |
| (b) भिलाई | ii) छत्तीसगड |
| (c) सालेम | iii)ओडिशा |
| (d) विजयनगर | iv) कर्नाटक |

**Answer Options :**
✖ A] (a)-(ii) (b)-(i) (c)-(iii) (d)-(iv)
✖ B] (a)-(i) (b)-(iii) (c)-(vi) (d)-(ii)
✖ C] (a)-(iii) (b)-(iv) (c)-(i) (d)-(ii)
✔ D] (a)-(iii) (b)-(ii) (c)-(i) (d)-(iv)

**Solutions :**
**लोहपोलाद उद्योग राज्य.**
**1) बोकारो झारखंड**

2) दुर्गापूर पश्चिमबंगाल
3) विशाखापट्टणम् आंध्रप्रदेश

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **1.00**

**Question No : 7**
**'गरमसुर टेकड्या'** महाराष्ट्राच्या कोणत्या जिल्हयात आढळतात ?

**Answer Options :**
✖ A] गडचिरोली
✖ B] गोंदिया
✔ C] नागपुर
✖ D] यवतमाळ

**Solutions :**

| टेकड्या | जिल्हे |
|---|---|
| 1) मालेगाव, रावणदेव, नांदगाव | वर्धा |
| 2) गरमसुर, जांबगड | नागपुर |
| 3) नवेगाव, गंगाझरी, दरेकसा | गोंदिया |
| 4) चिमूर, मूल टेकडया | चंद्रपुर |

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **1.00**

**Question No : 8**
**मिनीकॉय** आणि **मालदीव** बेटे कोणत्या चॅनलमुळे विभक्त झाली आहेत?

**Answer Options :**
✖ A] सात अंश चॅनल मुळे
✔ B] आठ अंश चॅनल मुळे
✖ C] पाच अंश चॅनल मुळे
✖ D] दहा अंश चॅनल मुळे

**Solutions :**
- आठ अंश चॅनल मुळे मिनीकॉय व मालदीव (भारत व मालदीव बेटे) वेगळी होतात.
- नऊ अंश चॅनल मुळे लक्षदीप व मिनीकॉय बेटे विभक्त होतात.
- दहा अंश चॅनल मुळे अंदमान व निकोबार बेटे वेगळी होतात.

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 9**
जनगणना **2001** आणि **2011** प्रमाणे महाराष्ट्रातील **बाललिंग गुणोत्तरातील फरक** किती?

**Answer Options :**
✖ A] 7
✖ B] 9
✔ C] 19
✖ D] 29

**Solutions :**

| जनगणना वर्ष | बाल लिंगगुणोतर (0 ते 6 वर्ष) | लिंग गुणोतर |
|---|---|---|
| 2001 | 913 | 922 |
| 2011 | 894 | 929 |

- 2001 ते 2011 या दशकात बाल लिंगगुणोतरामध्ये 19 ने घट झाली.
- 2001 ते 2011 या दशकात महाराष्ट्रामध्ये लिंग गुणोत्तर (स्त्री - पुरुष) यामध्ये 7 ने वाढ झाली.

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 10**
दिलेल्या विधानावरून **जिल्हा ओळखा.**

अ) या जिल्हयाचे लिंग गुणोत्तर 1000 पेक्षा जास्त आहे
ब) हा महाराष्ट्रातील पहिला 100% साक्षर जिल्हा आहे.
क) महाराष्ट्राचे नंदनवन म्हणून गौरविलेला हा जिल्हा पर्यटकांना एक वरदान आहे.

**Answer Options :**
✖ A] ठाणे
✖ B] मुंबई
✖ C] पुणे
✔ D] सिंधुदुर्ग

**Solutions :**
**महाराष्ट्रातील दोन जिल्ह्याचे लिंग गुणोत्तर 1000 पेक्षा अधिक आहे.**
**1) रत्नागिरी - 1122**
**2) सिंधुदुर्ग - 1036**

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **1.00**

**Question No : 11**
महाराष्ट्रातील **किती जिल्ह्यांच्या सीमा मध्यप्रदेश** राज्यास लागून आहेत?

**Answer Options :**
✖ A] 9
✖ B] 6
✔ C] 8
✖ D] 7

**Solutions :**
**मध्यप्रदेश राज्यास नंदुरबार, धुळे, जळगाव, बुलढाणा, अमरावती, नागपूर, भंडारा, व गोंदिया या आठ जिल्ह्यांच्या सिमा लागलेल्या आहेत.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **-0.25**

**Question No : 12**
भारतीय मूलभूत रस्ते सांख्यिकी 2019 नुसार भारतातील कोणते राज्य राष्ट्रीय महामार्गाच्या लांबीमध्ये पहिल्या क्रमांकाचे राज्य कोणते?

**Answer Options :**
✔ A] महाराष्ट्र
✖ B] उत्तरप्रदेश
✖ C] राजस्थान
✖ D] मध्यप्रदेश

**Solutions :**
**भारतातील मूलभूत रस्ते सांख्यिकी 2018 - 19 नुसार भारतातील राष्ट्रीय महामार्गांचा लांबीनुसार क्रम :**
**(1) महाराष्ट्र (2) उत्तर प्रदेश (3) राजस्थान (4) मध्य प्रदेश**

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 13**
**डॉ. त्रिवार्था** यांच्या हवामान वर्गीकरणानुसार महाराष्ट्राच्या कोणत्या प्रदेशाचा समावेश 'उष्णकटीबंधीय वर्षारण्याचा' हवामान विभागात केलेला आहे?

**Answer Options :**
✖ A] खानदेश
✖ B] मराठवाडा
✖ C] विदर्भ
✔ D] कोकण

**Solutions :**

Solutions :

- डॉ त्रिवार्था यांनी हवामानशास्त्रीयदृष्ट्या महाराष्ट्राची विभागणी 3 विभागांत केली आहे.

- **AM - उष्णकटीबंधीय वर्षारण्याचा हवामान विभाग → कोकण किणारपट्टी व पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्याचा पश्चिम भाग**
- **BS – उष्णकटीबंधीय स्टेपी किंवा निम्न शुष्क हवामान‌ाचा प्रदेश → पश्चिम महाराष्ट्र, खानदेश व मराठवाड्याचा औरंगाबाद, बीड, धारशिव, लातूर**
- **AW- उष्णकटीबंधीय दमट व कोटडे किंवा मॉन्सून सॅव्हाना हवामान‌ाचा विभाग → विदर्भ व मराठवाड्याच्या पूर्व भागाचा समावेश**

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **-0.25**

**Question No : 14**
महाराष्ट्रात **मॅंगनीज** चे साठे---------- जिल्ह्यात आढळतात.

**Answer Options :**
✔ A] नागपुर व भंडारा
✖ B] चंद्रपूर व गडचिरोली
✖ C] रायगड व रत्नागिरी
✖ D] चंद्रपुर

**Solutions :**
- भारतातील मॅंगनीज च्या एकूण साठ्यापैकी 40% साठा महाराष्ट्रात आहे. याचा उपयोग उच्च 'दर्जाचे पोलाद तयार करणे व ओतीव लोखंड तयार करण्यासाठी होतो, नागपुर, भंडारा व सिंधुदुर्ग येथे मॅंगनीज चे साठे आढळतात.

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **1.00**

**Question No : 15**
पर्जन्य प्रदेश आणि पर्जन्य छायेचा प्रदेश ही खालीलपैकी कोणत्या पर्जन्याची **वैशिष्ट्ये** आहेत?

**Answer Options :**
✖ A] आवर्त पर्जन्य
✔ B] प्रतिरोध पर्जन्य
✖ C] अभिसरण पर्जन्य
✖ D] यापैकी नाही

**Solutions :**
- अभिसरण पर्जन्य / आरोह पर्जन्य - ज्या प्रदेशात हवेची ऊर्ध्वगामी हालचाल होवून पडणाऱ्या पर्जन्यात अभिसरण पर्जन्य म्हणतात. विषुववृत्तीय भूभागात बहुधा दुपारनंतर या प्रकारचे पर्जन्य पडते.
- आवर्ताच्या निर्मितीमुळे जो पर्जन्य पडतो त्यास आवर्त पर्जन्य असे म्हणतात. आवर्तातील वारे उत्तर गोलार्धात घड्याळ्याच्या काट्यांच्या विरुद्ध दिशेने तर दक्षिण गोलार्धात घडयाळाच्या काटयाच्या दिशेने वाहतात.
  बंगालच्या उपसागरात आवर्त निर्माण होवून भारताच्या पूर्व किनारपाटीवर मोठ्या प्रमाणवर पर्जन्य देतात.

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **1.00**

**Question No : 16**
**महान्यायवादी** पदासंबंधी खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही?

**Answer Options :**
✔ A] तो मंत्री परिषदेची इच्छा असेपर्यंत आपल्या पदावर राहू शकतो.
✖ B] महान्यायवादी भारत सरकारला विधी विषयक बाबी वरती सल्ला देतो.
✖ C] भारत सरकारचा वकील म्हणून कार्यरत असताना भारत सरकारच्या संमती शिवाय कोणत्याही फौजदारी गुन्हाचा दोष असलेल्या व्यक्तीचा बचाव करू शकत नाहीत.
✖ D] वरीलपैकी एकही नाही.

**Solutions :**
- **महान्यायवादी यांची नेमणूक राष्ट्रपती मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने करतात.**

- **महान्यायवादी राष्ट्रपतींचीची मर्जी असेपर्यंत पद धारण करतात. निश्चित असा कार्यकाल राज्यघटनेत दिलेला नाही.**

---

Status : **Attempted**

Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 17**
राज्यघटना निर्मितीची जबाबदारी व कार्ये पार पाडण्यासाठी घटना समितीने विविध समित्या स्थापन केल्या होत्या. त्यात घटनेचा मसुदा परीक्षण करणाऱ्या विशेष समितीचे अध्यक्ष म्हणून कोणी काम केले?

**Answer Options :**
✖ A] डॉ. बी. आर. आंबेडकर
✖ B] डॉ. के. एम. मुन्शी
✔ C] पंडित जवाहरलाल नेहरू
✖ D] ग. वा. मावळकर

**Solutions :**
- **घटनेचा मसुदा परीक्षण करणाच्या 'विशेष' समितीचे अध्यक्ष पंडित जवाहरलाल नेहरू होते.**
- **मसुदा समितीचे अध्यक्ष** बी. आर. आंबेडकर **हे होते.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 18**
खालील-----असाधारण परिस्थितीमध्ये राज्यसूचीतील विषयांवर कायदे करण्याचा अधिकार राज्यघटनने संसदेला दिला आहे.

**Answer Options :**
✖ A] जेव्हा राज्यसभा तसा ठराव संमत करते.
✖ B] जेव्हा दोन किंवा अधिक राज्ये संयुक्तरीत्या संसदेला विनंती करतात.
✖ C] आंतरराष्ट्रीय करार आणि संकेत यांची अंमलबजावणी करण्यासाठी.
✔ D] वरीलपैकी सर्व

**Solutions :**
**पाच असाधारण परिस्थितीमध्ये राज्यसूचीतील विषयावर कायदे करण्याचा अधिकार राज्यघटनेने संसदेला दिला आहे.**
**1) जेव्हा राज्यसभा तसा ठराव संमत करते.**
**2) जेव्हा राष्ट्रीय आणीबाणी लागू असते.**
**3) जेव्हा दोन किंवा अधिक राज्य संयुक्तरीत्या संसदेला विनंती करतात.**
**4) आंतरराष्ट्रीय करार आणि संकेत यांची अंमलबजावणी करण्यासाठी**
**5) जेव्हा राज्यात राष्ट्रपती शासन लागू असते.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 19**
**'पंछी आयोग'**-------- यासाठी अनुकुल होता.

**Answer Options :**
✖ A] राज्यपालाचा कार्यकाळ राष्ट्रपतींच्याच मर्जीनुसार असावा.
✖ B] राष्ट्रपतीप्रमाणे राज्यपालाला महाभियोगाची तरतूद आवश्यक नाही.
✖ C] लोकसंख्येतील तफावत विचारात घेवून प्रत्येक राज्याला राज्यसभेत प्रतिनिधित्व देण्यात यावे.
✔ D] वरीलपैकी एकही नाही.

**Solutions :**
- पंछी आयोग केंद्र राज्य संबंधाच्या पुनः परीक्षणासाठी 27 एप्रिल 2007 रोजी आयोगाची केंद्राने स्थापना केली.
- पंछी आयोगाच्या शिफारसीनुसार राज्यपालाचा निश्चित असा 5 वर्षांचा कार्यकाल असावा.
- राष्ट्रपतीप्रमाणे राज्यपालाला महाभियोगाची तरतूद असावी.
- लोकसंख्येतील तफावत विचारात न घेता प्रत्येक राज्याला राज्यसभेत समान प्रतिनिधित्व देण्यात यावे.

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **1.00**

**Question No : 20**
सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश आणि------समावेश असतो.

**Answer Options :**

✖ A] इतर 31 न्यायाधीशांचा

✖ B]

राष्ट्रपती ठरविल इतक्या  इतर न्यायाधीशांचा

✔ C]

संसद ठरविल इतक्या  इतर न्यायाधीशांचा

✖ D]

मंत्रिमंडळ ठरविल इतक्या  इतर न्यायाधीशांचा

**Solutions :**

- सध्या सर्वोच्च न्यायालयात **34** न्यायाधीश आहेत.

- संसद वेळोवेळी इतर न्यायाधीशांच्या संख्येत वाढ करत असते.

- उच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या राष्ट्रपती ठरवतात.

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **-0.25**

**Question No : 21**

खालील विधाने विचारात घ्या:

a) पंचायतीमध्ये अनुसूचित जातीसाठी त्यांच्या लोकसंखेच्या प्रमाणात जागा राखून ठेवल्या जातील.
b) राज्याचे मुख्यमंत्री पंचायतीच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन करण्यासाठी दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची स्थापना करतील.
c) कलम-324 नुसार पंचायतीच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य निवडणुक आयोग स्थापन केला जातो.

वरीलपैकी कोणते विधानाने बरोबर आहे / आहेत ?

**Answer Options :**

✔ A] फक्त a

✖ B] फक्त a आणि c

✖ C] फक्त b आणि c

✖ D] a, b आणि c

**Solutions :**

- कलम **243 D** नुसार पंचायतीमध्ये **SC, ST** साठी त्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण आहे.

- राज्याचे राज्यपाल पंचायतींसाठी दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची स्थापना करतात.

- पंचायतीच्या निवडणुका घेण्यासाठी कलम - **243 K** मध्ये राज्य निवडणूक आयोग स्थापन करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **1.00**

**Question No : 22**

संसदेच्या अधिवेशनांबाबतीत खालीलपैकी कोणते **विधान/ने बरोबर आहे/आहेत?**

(a) संसदेचे अधिवेशन म्हणजे गृहाच्या पहिल्या बैठकीपासून सत्रसमाप्ती होईपर्यंतचा कालावधी
(b) गृह सत्रावसान करणे  व गृहाचे परत  अधिवेशन बोलाविणे याला अवकाशकाल (Recess) म्हणतात.
(c) साधारणपणे वर्षात संसदेची  चार अधिवेशने होतात.
(d) बैठक अनिश्चित कालपर्यंत तहकूब केली असल्यास ती पुन्हा केव्हाही बोलवली जावू शकते.

**Answer Options :**

✖ A] फक्त a

✖ B] फक्त b

✔ C] फक्त a, b, आणि d

✖ D] वरीलपैकी सर्व

**Solutions :**

- राष्ट्रपती वेळोवेळी संसदेच्या दोन्ही गृहांची अधिवेशने  बोलवितो.

- साधारणपणे वर्षात संसदेची तीन अधिवेशने असतात. संसदेच्या दोन अधिवेशनातील कालावधी सहा  महिन्यापेक्षा अधिक असू शकत नाही.

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **1.00**

**Question No : 23**
ग्राम विकास समितीतील सदस्यांची **एकूण कमाल संख्या**---------पेक्षा जास्त नसते.

**Answer Options :**
✖ A] 7
✖ B] 17
✔ C] 24
✖ D] 27

**Solutions :**
**ग्राम विकास समितीतील सदस्यांची एकूण संख्या, 12 पेक्षा कमी नसेल आणि 24 पेक्षा जास्त नसेल.**

**सरपंच हा ग्रामविकास समितीचा पदसिद्ध अध्यक्ष असेल.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 24**
_______बाबी सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येत नाहीत.

**Answer Options :**
✖ A]

राज्यघटनापूर्व काळातील तह, करार, कलमे, ठराव अशा प्रकारच्या दस्तऐवजा तून उद्भवणारे विवाद.

✖ B] आंतरराज्यीय जल विवाद.
✖ C] केंद्रांकडून राज्याला मिळणारी नुकसानभरपाई.
✔ D] वरीलपैकी सर्व.

**Solutions :**
- **सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आयोगाकडे सोपविलेल्या बाबी, केंद्र आणि राज्यांच्या यांच्यामधील सर्वसाधारण वाणिज्यिक विवाद येत नाहीत.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **1.00**

**Question No : 25**
***विधान (a):*** संघराज्यीय प्रणालीमध्ये अधिकारांची विभागणी ही एकात्मिक प्रणालीपेक्षा भिन्न असते.
***विधान(b)***: संघराज्यीय प्रणालीत केंद्र आणि प्रांतिक सरकारमध्ये अधिकारांची विभागणी असते तर एकात्मिक प्रणालीत अधिकारांची विभागणी नसते.

**Answer Options :**
✔ A] 'a' आणि 'b' दोन्हीही बरोबर आणि 'ब' हे 'अ' चे योग्य स्पष्टीकरण आहे.
✖ B] 'a' आणि 'b' दोन्हीही बरोबर आणि 'ब' हे 'अ' चे योग्य स्पष्टीकरण नाही.
✖ C] 'अ' हे बरोबर आहे, परंतू 'ब' हे चुकीचे आहे.
✖ D] 'अ' हे चुकीचे आहे, परंतू 'ब' हे बरोबर आहे.

**Solutions :**
- संघराज्यीय प्रणालीत घटनेद्वारे अधिकार विभागले जातात. *उदा.* अमेरिका, भारत, कॅनडा, ब्राझील.
- एकात्मिक पद्धतीत सर्व अधिकार केंद्र सरकारकडे एकवटलेले असतात. *उदा.* ब्रिटन, चीन, इटली, जपान, फ्रान्स

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **-0.25**

**Question No : 26**
पुढील विधाने अभ्यासा व **योग्य पर्याय निवडा.**

a] शैवालांमध्ये आढळून येणाऱ्या पेशी भित्तिका या Cellulose, Galactan यांपासून तयार झालेल्या असतात.
b] वनस्पतींमध्ये आढळून येणाऱ्या पेशी भित्तिका या केवळ Hemi cellulose पासून तयार झालेल्या असतात.

**Answer Options :**

✖ A] a, b अयोग्य

✖ B] a, b योग्य

✖ C] a अयोग्य, b योग्य

✔ D] a योग्य, b अयोग्य

**Solutions :**

- **Cell wall – Plasma membrane च्या बाहेरचे आवरण. Algae, fungi काही protists वनस्पती मध्ये आढळून येते .**
- **Algae cell wall: cellulose+ Galactan + Mannos + calcium +calcium pectate**
- **Plant cell wall: Hemicellulose +pectin +lipids+ proteins**

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **1.00**

**Question No : 27**
सिमेंट निर्मिती साठी पुढीलपैकी कोणते घटक वापरतात.

a] silica, Aluminium oxide
b] Iron oxide, Magnesia
c] Limestone.

**Answer Options :**

✖ A] a, b

✖ B] b,c

✔ C] a, b, c

✖ D] वरीलपैकी एकही नाही.

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 28**
विधाने अभ्यास व योग्य पर्याय निवडा .

A) थायरॉईड ग्रंथी द्वारे स्रवल्या जाणाऱ्या T Lymphocytes या शरीराची प्रतिकारशक्ती वाढवण्याचे कार्य करतात.
B) पॅराथायरॉइड ग्रंथी ही शरीरातील calcium आणि phosphate चा समतोल राखण्याचे कार्य करते.

**Answer Options :**

✖ A] a, b योग्य

✖ B] a, b अयोग्य

✔ C] a अयोग्य, b योग्य

✖ D] a योग्य b अयोग्य

**Solutions :**

- **T Lymphocytes : Thymus ग्रंथींकड्न स्रवण.**
- **प्रतिकारशक्ती वाढवण्याचे कार्य करतात.**
- **वृद्धांमध्ये Thymus Gland चा आकार लहान होत जातो ,त्यामुळे प्रतिकारशक्ती कमी होत जाते.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **-0.25**

**Question No : 29**
**Klinfelter's syndrome हा आजार**

a) गुणसूत्रीय आजार असून तो महिलांमध्ये आढळून येतो.
b) यामध्ये अधिक चे X गुणसूत्र उपस्थित असून XXYअशी जनुकीय रचना असते.

**Answer Options :**

✖ A] a योग्य b अयोग्य

✔ B] a अयोग्य, b योग्य

✖ C] a, b योग्य

✖ D] a, b अयोग्य

**Solutions :**

- **Klinefelter's syndrome :**

- अधिकच्या x गुणसूत्रांच्या पुरुषांमध्ये आढळ .
- गुणसूत्रीय आजार.
- यामध्ये पुरुषी शारीरिक रचणे बरोबरच काही स्त्रीत्वाची लक्षणे तयार होतात.
- असे लोक पुनरुत्पादन दृष्ट्या **sterile**असतात.

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **-0.25**

**Question No : 30**

Beryllium fluoride ($BeF_2$) ची dipole moment पुढीलपैकी कशामुळे शून्य आहे ?

**Answer Options :**

✖ A] समतोल आकार
✔ B] समान परिमाणांचे, विरुद्ध दिशांना असणारे दोन बंध.
✖ C] Be आणि F च्या रेणूंचा सारखा आकार.
✖ D] Be आणि F ची एकमेकांकडे समान आसक्ती. (Attraction)

**Solutions :**

**Beryllium flouride ($BeF_2$) मध्ये दोन बंधाचे dipole हे समान परिमाणांचे परंतु विरुद्ध दिशांना असल्याने एकमेकांना निष्प्रभ (cancel) करतात.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **1.00**

**Question No : 31**

a] खडबडीत आंतर्द्रव्यजालिका - प्रथिन संश्लेषण
b] गुळगुळीत आंतर्द्रव्यजालिका - मेद संश्लेषण

**Answer Options :**

✖ A] a योग्य ,b अयोग्य
✔ B] a, b योग्य
✖ C] a अयोग्य , b योग्य
✖ D] a, b अयोग्य

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 32**

Phylum Porifera (संघ पोरिफेरा) बद्दल खालील विधाने अभ्यासा आणि **योग्य पर्याय** निवडा.

a) हे बहुपेशीय (Multicellular) एकस्तरीय (cellular Level) सजीव असतात
b) हे  केवळ समुद्रीय सजीव (marine animals) आहेत.
c) शरीराच्या आत आणि बाहेर या पाण्याचे आणि  अन्नाचे वहन हे ostia आणि Osculum  द्वारे होते.
d) यांचे प्रजनन लैंगिक (sexual) आणि अलैंगिक (asexual) असते.

**Answer Options :**

✖ A] a, b, c, d बरोबर
✔ B] a, c, d बरोबर
✖ C] a, b, c बरोबर
✖ D] c, d, b बरोबर

**Solutions :**

- संघ पोरीफेरा
  **Most primitive pore bearing marine and fresh water animals.**
- शरीर संघटन - **Cellular level.**
- प्रजनन: अलैंगिक ⇢ **खंडीभवन (fragmentation), मुकुलायन (Budding) यांच्यामार्फत किंवा Gemmules मार्फत.**
  लैंगिक → **अंडपेशी(egg) व शुक्राणू (sperms) एकाच प्राण्यापासून (Bisexually) तयार होतात.**
- **Ostia and Osculum - porifera संघातील प्राण्यांच्या शरीरावर असणारी दोन प्रकारची छिद्रे.**
- **Ostia** - अनेक असतात.
  कार्य:   अन्न, पाणी व हवेचे शरीराबाहेरून आत वहन.
- **Osculum**- एकच असते.
  कार्य :      उत्सर्जित पदार्थांचे शरीराबाहेर वहन
- **Examples:  Sycon, Euplectella (Venus flower Basket ,Thena ,  Euspongla)**

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 33**
पुढीलपैकी कोणती Redox अभिक्रिया आहे?

**Answer Options :**

✖ A]
$CH_2 + 2O_2 \rightarrow CO_2 + 2H_2O$

✔ B]
$ZnO + C \rightarrow Zn + C0$

✖ C]
$2Cu + O_2 \rightarrow 2CuO$

✖ D]
$CO + H_2 \rightarrow CH_3OH$

**Solutions :**
**1) $CH_4 + 2O_2 \rightarrow CO_2 + 2H_2O$**

या अभिक्रियेत मिथेन ने हायड्रोजन गमावला आहे. म्हणजेच ही ऑक्सिडीकरण अभिक्रिया आहे.

**2) $ZnO + C \rightarrow Zn + C0$**
येथे **Zn** कडून ऑक्सिजन चा **loss** होऊन तो **C** कडून मिळवला गेला म्हणजेच एकाच वेळी ऑक्सिडीकरण आणि क्षपण झाले. म्हणून ही **redox** अभिक्रिया आहे.

**3) $2Cu + O_2 \rightarrow 2CuO$**
येथे **Cu** ने **oxygen** मिळवला व काळ्या रंगाचे **Coper Oxide** तयार झाले. ⇢ ऑक्सिडीकरण

**4) $CO + H_2 = CH_3OH$**
**CO** कडून **O** मिळवला गेला. ⇢ क्षपण अभिक्रिया.

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **-0.25**

**Question No : 34**
पुढीलपैकी Glycolysis प्रक्रिये दरम्यान घडुन येणारी कोणती प्रक्रिया Hexokinase विकराद्वारे घडवून आणली जाते?

**Answer Options :**

✔ A]
Glucose ⇢ Glucose 6 phosphate

✖ B]
Fructose - 6- phosphate ⇢ Glyceraldehyde 3 phosphate.

✖ C]
Phosphoenal pyruvate ⇢ pyruvate

✖ D] वरीलपैकी एकही नाही.

**Solutions :**
**1] Hexokinase +ATP + $Mg^{2+}$**

**2] Phosphofructokinase विकर + ATP**

**3] PYRUVATE KINASE + ADP + PI**

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **-0.25**

**Question No : 35**
**" DNA double Helix"** बद्दल खालील विधाने अभ्यासा.

A) यामध्ये Monocyclic Purine Bases अंतर्भूत असतात.
B) यामध्ये Dicyclic purine Bases विशिष्ट रचनेत समाविष्ट असतात.
C) DNA Double helix हे nitrogen base and phosphate group यांच्याकडून पूर्णतः तयार होते.
D) विविध उपघटकांना एकत्रित जोडण्यासाठी या रचनेत Hydrogen Bonds आणि Phosphoester Bonds समाविष्ट असतात.

**Answer Options :**

✖ A] a, b योग्य d, c अयोग्य

✔ B] a, b, d योग्य c अयोग्य

✖ C] a, c, d, योग्य b अयोग्य

✖ D] a, b, c, योग्य d अयोग्य

**Solutions :**

- **DNA Double Helix –**
  वॅटसन आणि क्रिक यांच्याकडून शोध :
  DNA चे Double stands दर्शवणारे प्रारूप.
  **Nitrogen base +sugar +Phosphate group**
- Nitrogen Bases in DNA -purines -adenine Guanine, Double chained benzol structure.
- Pyrimidines- Thymine and cytosine.
  -single chained benzol ring.
- Adenine and thymine are paired together with two hydrogen bonds (A=T) and Gaunine hydrogen bonds (G=C) = complementary base pairing.
  Glycosidic bonds- present between.
- Nitrogen bases (A,T,G,C) and pentose sugar.
  Phosphate group-present between sugar and phosphate group.

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 36**

पुढील विधाने अभ्यास व **योग्य पर्याय निवड.**

a) सेंद्रिय संयुगे: वनस्पती व प्राणी यांच्यापासून मिळणारी संयुगे.
b) असेंद्रिय संयुगे: कृत्रिम रित्या तयार करण्यात येणारे घटक.

**Answer Options :**

✖ A] a, b योग्य

✖ B] a, b अयोग्य

✔ C] a योग्य, b अयोग्य

✖ D] a अयोग्य b योग्य

**Solutions :**

**असेंद्रिय संयुगे : खनिजांपासून मिळणारी संयुगे.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 37**

पुढील विधाने अभ्यासा, योग्य पर्याय निवडा.

a) L-Glutamic acid चा वापर calcium आणि iron ची कमतरता भरून काढण्यासाठी होतो.
b) Gluconia acid चा उपयोग Monosodium Glutamate च्या उत्पादनात होतो.
c) Lactic acid हा Nitrogen चा उत्तम स्त्रोत आहे.

**Answer Options :**

✖ A] a, b, c बरोबर

✖ B] a, b, c चूक

✖ C] a, b बरोबर c चुक

✔ D] a, b चुक c बरोबर

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **-0.25**

**Question No : 38**

a] दगडी कोळसा, कोक -स्फटिकीय अपरूप .
b] चारकोल, फुलरीन - अस्फटिकीय अपरूप.

**Answer Options :**

✔ A] a, b अयोग्य
✖ B] a, b योग्य
✖ C] a योग्य b अयोग्य
✖ D] a अयोग्य b योग्य

**Solutions :**
**1) दगडी कोळसा, कोक, चारकोल - कार्बनची अस्फटिकीय अपरूप**
**2) हिरा, ग्रॅफाइट, फुलरीन्स - कार्बन ची स्फटिकीय अपरूपे**

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 39**
योग्य विधाने निवडा.

a] लॅथेनॉइड आणि ॲक्टीनाईड श्रेणी **f** या खंडांत समाविष्ट आहेत.
b] यांना आंतर संक्रमक श्रेणी म्हणतात.
c] लँथॅनॉईडस किरणोत्सारी असतात.
d] अपवाद - Promesium Lanthenoid किरणोत्सारी नाहीत.

**Answer Options :**
✖ A] a, b, c, d योग्य
✖ B] a, b, c, d अयोग्य
✖ C] a, b अयोग्य c, d योग्य
✔ D] a, b योग्य c, d अयोग्य

**Solutions :**
- **LANTHENOIDS - किरणोत्सारी नसतात.**
- **PROMASIUM LANTHENOIDS - अपवाद - किरणोत्सारी असतो.**
- **अक्टिनोईड्स मात्र किरणोत्सारी असतात.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **-0.25**

**Question No : 40**
**यूग्लिना, अमिबा, वोल्व्होक्स, पॅरामेशिअम** ही पुढीलपैकी ------------सृष्टीची (Kingdom) उदाहरणे आहेत.

**Answer Options :**
✖ A] Fungi (कवक)
✔ B] प्रोटिस्टा
✖ C] मोनेरा
✖ D] युबॅक्टरीया

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **-0.25**

**Question No : 41**
*खालील विधाने विचारात घ्या.*

1) 2022 NATO माद्रिद शिखर परिषद लंडन, UK येथे 28 ते 30 जून 2022 या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.
2) 1957 मध्ये पॅरिसमध्ये झालेल्या पहिल्या शिखर बैठकीपासून ही शिखर परिषदेची 28 वी आवृत्ती होती.

**Answer Options :**
✖ A] पहिले बरोबर दुसरे चूक
✖ B] पहिले चूक दुसरे बरोबर
✖ C] दोन्ही बरोबर
✔ D] वरीलपैकी नाही

**Solutions :**
- **2022 NATO माद्रिद शिखर परिषद माद्रिद, स्पेन येथे 28 ते 30 जून 2022 या कालावधीत आयोजित करण्यात आली होती.**
- **1957 मध्ये पॅरिसमध्ये झालेल्या पहिल्या शिखर बैठकीपासून ही शिखर परिषदेची 32 वी आवृत्ती होती.**
- **NATO सरचिटणीस जेन्स स्टोल्टनबर्ग यांच्या अध्यक्षतेखाली ही परिषद होती.**
तीन दिवसीय शिखर परिषदेत नाटो सदस्य आणि भागीदार देशांचे राष्ट्रप्रमुख आणि सरकार प्रमुख सहभागी झाले होते.

- नाटो शिखर बैठक हे सदस्य देशासाठी युतीच्या क्रियाकलापाचे मूल्याकन आणि धोरणात्मक दिशा देण्यासाठी एक व्यासपीठ आहे.

- **NATO ची स्थापना: 4 एप्रिल 1949;**
  **NATO मुख्यालय: ब्रुसेल्स, बेल्जियम;**
  **नाटो सरचिटणीस: जेन्स स्टॉलटेनबर्ग;**
  **NATO एकूण सदस्य: 30; NATO चा शेवटचा सदस्य: उत्तर मॅसेडोनिया.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 42**
**'ओशियन मेल्टिंग ग्रीनलँड एअरबोर्न मिशन'** कोणत्या देशाशी संबंधित आहे?

**Answer Options :**

✖ A] रशिया
✖ B] इस्रायल
✔ C] USA
✖ D] चीन

**Solutions :**
- नासाच्या **'ओशन्स मेल्टिंग ग्रीनलँड एअरबोर्न मिशन'** मध्ये असे आढळून आले आहे की ग्रीनलँडच्या हिमनद्या जे महासागरात रिकामे होतात, जसे की अपुसियाजिक ग्लेशियर, जलद बर्फ नष्ट होण्याचा धोका जास्त असतो.
- ग्रीनलँडच्या बर्फाच्या शीटमधून बर्फ कमी होणे हे इतर कोणत्याही स्रोतापेक्षा महासागरांच्या जागतिक वाढीस अधिक योगदान देते हे उघड झाले. जर ग्रीनलँडची सर्व बर्फाची चादर वितळली तर जागतिक समुद्र पातळी सुमारे 24 फूट (7.4 मीटर) वाढेल.

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **1.00**

**Question No : 43**
नवी दिल्लीतील प्रतिष्ठित मार्ग असलेल्या **'राज पथ'**चे नवीन नाव काय आहे?

**Answer Options :**

✖ A] आत्मनिर्भर पथ
✔ B] कर्तव्य पथ
✖ C] विकास पथ
✖ D] जन मार्ग

**Solutions :**
- पंतप्रधान नरेंद्र मोदी इंडिया गेट, नवी दिल्ली येथे **'कर्तव्य पथ'** चे **उद्घाटन** करणार आहेत.
- कर्तव्य पथ सुशोभित लँडस्केप, लॉन, जोडलेली हिरवीगार जागा, नूतनीकरण केलेले कालवे, सुधारित पार्किंगची जागा आणि नवीन प्रदर्शन फलक प्रदर्शित करेल.
  यामध्येस घनकचरा व्यवस्थापन, वापरलेल्या पाण्याची ऊर्जा-कार्यक्षम प्रकाश व्यवस्था यांचा पुनर्वापर यासारख्या अनेक टिकाऊपणा वैशिष्ट्यांचाही समावेश आहे.
- भारत सरकारने राजपथ आणि सेंट्रल व्हिस्टा लॉनचे नाव बदलून कार्तव्य पथ करण्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे भारतातील ब्रिटीश वसाहतीचे अवशेष नष्ट झाल्याचे सांगण्यात येत आहे.
- राजपथ आणि सेंट्रल व्हिस्टा लॉनचे नामकरण करण्याच्या उद्देशाने 7 सप्टेंबर रोजी बोलावलेल्या विशेष बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला .
- यापूर्वी मोदी सरकारने पंतप्रधानांचे निवासस्थान असलेल्या रस्त्याचे नाव बदलून रेसकोर्स रोड ते लोककल्याण मार्ग असे केले होते.
- **नेताजी पुतळा ते राष्ट्रपती भवनापर्यंतचा संपूर्ण मार्ग आणि परिसर कर्तव्य पथमध्ये समाविष्ट आहे . हा मार्ग रायसीना हिलवरील राष्ट्रपती भवनापासून विजय चौक आणि इंडिया गेटमार्गे दिल्लीतील नॅशनल स्टेडियमपर्यंत जातो.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **-0.25**

**Question No : 44**
राज्यांच्या **स्टार्ट-अप रँकिंग, 2021** या विषयात खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे.

1) राज्यांच्या स्टार्ट-अप रँकिंग, 2021 च्या तिसऱ्या आवृत्तीत महाराष्ट्र "सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे" म्हणून उदयास आले .
2) तर ईशान्येकडील (NE) राज्यांमध्ये आसाम सर्वोच्च सन्मान मिळवला .

**Answer Options :**

✖ A] 1
✖ B] 2
✖ C] दोन्ही
✔ D] वरीलपैकी नाही

**Solutions :**

- राज्यांच्या स्टार्ट-अप रँकिंग, 2021 च्या **तिसऱ्या आवृत्तीत** गुजरात आणि कर्नाटक "सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे" म्हणून उदयास आले , तर ईशान्येकडील (NE) राज्यांमध्ये मेघालयाने सर्वोच्च सन्मान मिळवला .
- 2020 मध्ये झालेल्या सर्वेक्षणाच्या **दुसऱ्या आवृत्तीत**, गुजरात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारा ठरला. ही क्रमवारी उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी स्टार्टअप इकोसिस्टम विकसित करण्यासाठी घेतलेल्या पुढाकारांवर आधारित आहे.
  या उपक्रमांमध्ये स्टार्टअप इंडिया उपक्रम, एकाधिक निधी आणि उष्मायन समर्थन आणि सरकारने 16 जानेवारी हा स्टार्टअप दिवस म्हणून घोषित केला आहे.

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **1.00**

**Question No : 45**
खालील विधानापैकी **'राष्ट्रीय हायड्रोजन मिशन'** बाबतीत अयोग्य कथन ओळखा.

(a)नूतनीकरण स्त्रोतांपासून कार्बन-मुक्त इंधन तयार करून भारताला ग्रीन हायड्रोजनचे जागतिक केंद्र बनविने.
(b)या मिशनचे अंतीम उद्दिष्ट म्हणजे स्वातंत्र्याची 100 वर्षे साजरी करण्यासाठी 2047 पर्यंत ऊर्जा उत्पादनात आत्मनिर्भरता आणणे.
(c) सौर आणि पवन उर्जेमध्ये सर्वाधीक वाटा महाराष्ट्र राज्याचा आहे

**Answer Options :**
✖ A] a
✖ B] b
✔ C] c
✖ D] वरीलपैकी एकही नाही

**Solutions :**

- **सौर आणि पवन उर्जेमध्ये भारतीय राज्यांचा वाटा :**
  **1) कर्नाटक - 29%**
  **2) राजस्थान - 20%**
  **3) तामिळनाडू - 18%**
  **4) आंध्रप्रदेश - 16%**
  **5) गुजरात - 14%**

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **-0.25**

**Question No : 46**
महिला उद्योजकांना मदत करण्यासाठी कोणत्या राज्याने **'महिला निधी'** सुरू केला ?

**Answer Options :**
✖ A] उत्तर प्रदेश
✔ B] राजस्थान
✖ C] मध्यप्रदेश
✖ D] ओडिसा

**Solutions :**

- महिला उद्योजकांना मदत करण्यासाठी राजस्थान सरकारने 'महिला निधी' सुरू केली.
- राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांनी कर्जाच्या माध्यमातून महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी 'महिला निधी' ही कर्ज योजना सुरू केली आहे.
- या योजनेंतर्गत महिलांना दैनंदिन गरजांव्यतिरिक्त व्यवसायाचा विस्तार आणि नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी सुलभ कर्ज उपलब्ध होणार आहे.
  2022-23 च्या अर्थसंकल्पात, सरकारने सांगितले की ते राजस्थान ग्रामीण उपजीविका विकास परिषदेच्या माध्यमातून 'महिला निधी' स्थापन करेल .
- तेलंगणानंतर राजस्थान हे देशातील दुसरे राज्य आहे , जिथे महिला निधीची स्थापना करण्यात आली आहे.

- **सर्व स्पर्धात्मक परीक्षांसाठी महत्त्वाचे मुद्दे :**
  राजस्थानचे राज्यपाल : कलराज मिश्रा
  राजस्थान राजधानी: जयपूर
  राजस्थानचे मुख्यमंत्री: अशोक गेहलोत.

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**

Status : **1.00**

**Question No : 47**
भारतीय अर्थतज्ञ .......... यांची संयुक्त राष्ट्रांच्या सल्लागार मंडळाच्या सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे?

**Answer Options :**

✖ A] रंगनाथ राजन
✔ B] जयती घोष
✖ C] शंकर आचार्य
✖ D] बिना अग्रवाल

**Solutions :**

- संयुक्त राष्ट्रांचे (UN) सरचिटणीस, अँटोनियो गुटेरेस यांनी भारतीय विकास अर्थशास्त्रज्ञ जयती घोष यांची प्रभावी बहुपक्षीयतेवर संयुक्त राष्ट्रांच्या नव्याने स्थापन केलेल्या सल्लागार मंडळाच्या सदस्य म्हणून नियुक्तीची घोषणा केली आहे.
- लाइबेरियाचे माजी अध्यक्ष आणि नोबेल पारितोषिक विजेते एलेन जॉन्सन सरलीफ आणि माजी स्वीडिश पंतप्रधान स्टीफन लोफवेन हे 12 सदस्यीय प्रभावी बहुपक्षीयतेवरील उच्च-स्तरीय सल्लागार मंडळाचे सह-अध्यक्ष असतील.
- नवीन सल्लागार मंडळाला महिला आणि मुलींच्या केंद्रस्थानासह आमच्या सामायिक अजेंडातील कल्पनांवर आधारित विचार तयार करण्यास सांगितले जाईल आणि अधिक प्रभावी बहुपक्षीय व्यवस्थांसाठी ठोस सूचना करण्यासाठी तरुण लोक आणि भावी पिढ्यांचे हित लक्षात घेण्याची गरज आहे.
- जयती घोष या युनिव्हर्सिटी ऑफ मॅसॅच्युसेट्स अॅमहर्स्टमध्ये प्रोफेसर आहेत .
- त्या पूर्वी अर्थशास्त्राच्या प्राध्यापक होत्या आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या स्कूल ऑफ सोशल सायन्सेस, सेंटर फॉर इकॉनॉमिक स्टडीज अँड प्लॅनिंगच्या अध्यक्षा होत्या.
- ती UN च्या आर्थिक आणि सामाजिक प्रकरणांवरील उच्च-स्तरीय सल्लागार मंडळाच्या सदस्या देखील आहेत.

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **-0.25**

**Question No : 48**
खालील विधानांपैकी कोणते विधान **अचूक** आहे ?

1) योजना आयोगाने "इंडियाज बूमिंग गिग आणि प्लॅटफॉर्म इकॉनॉमी" नावाचा अहवाल प्रसिद्ध केला .
2) सुमन बेरी, आयोगाचे उपाध्यक्ष अमिताभ कांत आणि विशेष सचिव डॉ के राजेश्वर राव यांनी हा अहवाल जारी केला.
3) हा अहवाल भारतातील गिग-प्लॅटफॉर्म अर्थव्यवस्थेबद्दल सखोल दृष्टिकोन आणि सूचना देते .

**Answer Options :**

✔ A] 2 आणि 3
✖ B] 1, 2 आणि 3
✖ C] 1 आणि 3
✖ D] फक्त 1

**Solutions :**

- NITI आयोगाने "इंडियाज बूमिंग गिग आणि प्लॅटफॉर्म इकॉनॉमी" नावाचा अहवाल प्रसिद्ध केला .
- सुमन बेरी, NITI आयोगाचे उपाध्यक्ष, अमिताभ कांत आणि विशेष सचिव डॉ के राजेश्वर राव यांनी हा अहवाल जारी केला. या प्रकारचा पहिला अभ्यास, भारतातील गिग-प्लॅटफॉर्म अर्थव्यवस्थेबद्दल सखोल दृष्टिकोन आणि सूचना देते .
- सीईओ अमिताभ कांत यांनी भारताच्या वाढत्या शहरीकरणाच्या प्रकाशात आणि इंटरनेट, डिजिटल तंत्रज्ञान आणि सेलफोन्सच्या व्यापक प्रवेशाच्या प्रकाशात रोजगार निर्माण करण्याच्या उद्योगाच्या क्षमतेवर भर दिला.

- **महत्त्वाचे मुद्दे:**
  हा अहवाल क्षेत्राचा सध्याचा आकार आणि रोजगार निर्मितीच्या संभाव्यतेची गणना करण्यासाठी एक व्यापक पद्धतशीर दृष्टिकोन प्रदान करतो.
  हे या **विकसनशील उद्योगाचे फायदे आणि तोटे तपासते, सामाजिक सुरक्षा कार्यक्रमांसाठी आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धती दाखवते आणि उद्योगातील विविध कामगार श्रेणींसाठी कौशल्य विकास आणि रोजगार निर्मितीसाठी योजनांची रूपरेषा दर्शवते.**

- **अहवालाबद्दल:**
  संशोधनानुसार, गिग इकॉनॉमीमध्ये 2020-21 मध्ये 77 लाख (7.7 दशलक्ष) कर्मचारी कार्यरत होते.
  ते भारताच्या एकूण श्रमशक्तीच्या 1.5 टक्के किंवा बिगर कृषी कामगारांच्या 2.6 टक्के आहेत.
  2029-2030 पर्यंत, गिग इकॉनॉमीमध्ये 2.35 कोटी (23.5 दशलक्ष) कामगार असतील. 2029-2030 पर्यंत, टमटम कामगारांचा भारतातील गैर-कृषी कर्मचार्यांपैकी 6.7 टक्के आणि सर्व उत्पन्नाच्या 4.1 टक्के वाटा असेल असा अंदाज आहे.
  सध्या, मध्यम-कुशल व्यवसाय सुमारे 47% टमटम मजूर बनवतात, उच्च कुशल नोकर्‍या सुमारे 22% आणि कमी-कुशल नोकर्‍या सुमारे 31% बनवतात.
  हा कल सूचित करतो की मध्यम कौशल्य असलेल्या कामगारांची एकाग्रता हळूहळू कमी होत आहे तर कमी आणि उच्च कौशल्ये असलेल्या कामगारांची संख्या वाढत आहे.
  अहवालात असे सुचवले आहे की स्वयंरोजगार असलेल्या लोकांना प्रादेशिक आणि ग्रामीण खाद्यपदार्थ, स्ट्रीट फूड इ. विक्रीच्या व्यवसायात प्लॅटफॉर्मसह जोडणे, त्यांना त्यांची उत्पादने शहरे आणि शहरांमधील मोठ्या बाजारपेठांमध्ये विकण्यास सक्षम करण्यासाठी विशेषतः उत्पादनांच्या माध्यमातून वित्तपुरवठ्याचा वेग वाढवणे. प्लॅटफॉर्म कामगारांसाठी डिझाइन केलेले.
  या अहवालात प्लॅटफॉर्म-नेतृत्वातील परिवर्तनात्मक आणि परिणाम-आधारित कौशल्य, कामगार आणि त्यांच्या कुटुंबांना लैंगिक समस्या आणि प्रवेशयोग्यतेबद्दल शिक्षित करणाऱ्या कार्यक्रमांद्वारे सामाजिक समावेश सुधारणे आणि सामाजिक सुरक्षा 2020 वरील संहितेनुसार भागीदारीत सामाजिक सुरक्षा उपायांचा विस्तार करण्याची शिफारस केली आहे

इतर सूचनांमध्ये टमटम आणि प्लॅटफॉर्म कर्मचाऱ्यांच्या आकाराची गणना करण्यासाठी दुसरी जनगणना व्यायाम आयोजित करणे आणि टमटम कामगारांना ओळखण्यासाठी अधिकृत जनगणना (नियतकालिक श्रमिक दल सर्वेक्षण) दरम्यान डेटा गोळा करणे समाविष्ट आहे.

■सर्व स्पर्धात्मक परीक्षांसाठी महत्त्वाचे टेकअवे:■
नीती आयोगाचे अध्यक्ष: पंतप्रधान नरेंद्र मोदी
नीती आयोगाचे उपाध्यक्ष: सुमन बेरी

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **-0.25**

**Question No : 49**
2022 महिला जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपचे ठिकाण कोणते आहे?

**Answer Options :**
✔ A] इस्तंबूल
✖ B] मंगोलिया
✖ C] नवी दिल्ली
✖ D] ढाका

**Solutions :**
- इंटरनॅशनल बॉक्सिंग असोसिएशन (IBA) 2022 महिला : जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिप इस्तंबूल, तुर्की येथे आयोजित करण्यात आली होती. भारतीय संघाने एकूण तीन पदकांसह (एक सुवर्ण आणि दोन कांस्य) स्पर्धा पूर्ण केली.
- तेलंगणातील बॉक्सर निखत जरीनने 52 किलो गटात सुवर्ण, मनीषा (57 किलो) आणि परवीन (63 किलो) कांस्यपदक जिंकले. **ऑलिम्पिक आणि विश्वविजेता बुसेनाझ सर्मेनेलीला सर्वोत्कृष्ट बॉक्सर** म्हणून गौरविण्यात आले.

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 50**
**भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT)** कोणत्या देशामध्ये भारताबाहेरील आपली पहिली शाखा स्थापन करणार आहे ?

**Answer Options :**
✖ A] बांग्लादेश
✔ B] संयुक्त अरब अमिराती
✖ C] श्रीलंका
✖ D] नेपाळ

**Solutions :**
- भारत आणि संयुक्त अरब अमिराती (UAE) व्यापार कराराचा भाग म्हणून भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) संयुक्त अरब अमिराती मध्ये भारताबाहेरील आपली पहिली शाखा स्थापन करणार आहे.
- सांस्कृतिक प्रकल्प, परस्पर सांस्कृतिक देवाणघेवाण आणि प्रदर्शने सुलभ करण्यासाठी आणि प्रोत्साहन देण्यासाठी दोन्ही राष्ट्रे भारत युएई सांस्कृतिक परिषद देखील स्थापन करतील.
- **संयुक्त अरब अमिराती विषयी :**
  राजधानी : अबुधाबी
  चलन : संयुक्त अरब अमिराती दिरहम
  खलीफा (प्रमुख) : खलिफा बिन नहयान

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 51**
2022 मध्ये **चौथा बांगलादेश चित्रपट महोत्सव** कोणत्या भारतीय शहरात आयोजित केला आहे?

**Answer Options :**
✖ A] गुवाहाटी
✔ B] कोलकाता
✖ C] कोहिमा
✖ D] इंफाळ

**Solutions :**
- बांगलादेश चित्रपट महोत्सवाची चौथी आवृत्ती **कोलकातामध्ये** आयोजित केली जात आहे.
- पाच दिवस चालणाऱ्या या कार्यक्रमात बांगलादेशातील 37 चित्रपट आणि माहितीपट दाखवले जाणार आहेत.
- कोलकाता येथे बांगलादेश चित्रपट महोत्सवाचे आयोजन करण्याचे हे चौथे वर्ष आहे.

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 52**
**'साहित्य अकादमी युवा पुरस्कार 2021**' मराठी भाषेसाठीचा पुरस्कार__________ यांना देण्यात आला.

**Answer Options :**

✖ A] नंदा खरे
✖ B] प्राजक्त देशमुख
✖ C] सुशील शिंदे
✔ D] प्रणव सखदेव

**Solutions :**

- **प्रणव सखदेव यांच्या 'काळेकरडे स्ट्रोक्स' या कादंबरीसाठी मराठी भाषेसाठीचा** वर्ष 2021 चा 'साहित्य अकादमी युवा पुरस्कार' देण्यात आला आहे.

- **साहित्य अकादमीची स्थापना:** 12 मार्च, 1954
  **मुख्यालय** : दिल्ली
  **प्रादेशिक कार्यालये :** कोलकाता, बंगळुरू, चेन्नई, मुंबई.
  **अकादमीचे पहिले अध्यक्ष :** पं. जवाहरलाल नेहरू,

- **अकादमीचे सध्याचे अध्यक्ष** : चंद्रशेखर कंबार (जाने. 2018 ते डिसें. 2022) (कंबार हे कन्नड भाषेचे कवी व लेखक तसेच दिग्दर्शक आहेत. पूर्वी ते हम्पी मधील कन्नड विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू देखील होते.)
- भारतातील 24 भाषांसाठी (भारतीय संविधानाच्या आठव्या परिशिष्टातील 22 भाषा आणि इंग्रजी व राजस्थानी) हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो.

- **पुरस्कारांची रचना -**
  साहित्य अकादमीकडून 24 भाषांसाठी एकूण 5 प्रकारात पुरस्कार दिले जातात.
- **पुरस्कारांचे वर्गीकरण -**
  अ) 'साहित्य अकादमी पुरस्कार' - रचनात्मक लिखाणासाठी दिला जाणारा मुख्य पुरस्कार.
  ब) भाषा सन्मान पुरस्कार
  क) अनुवादासाठी पुरस्कार
  ड) बाल साहित्य पुरस्कार
  इ) युवा पुरस्कार

- **प्रणव सखदेव -**
  मराठी लेखक, कवी, बालसाहित्यिक आणि अनुवादक. ते वृत्तपत्रीय लिखाणही करतात. सखदेव यांनी लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स या दैनिकांमध्ये उपसंपादक म्हणून काम केले आहे. लेखन आणि अनुवादाचे काम करणारे प्रणव सखदेव यांनी पत्रकारितेच्या मार्गावरून साहित्यनिर्मितीची वाट निवडली. कविता, कथा, कादंबरी या तिन्ही साहित्यप्रकारांत त्यांची पुस्तके प्रकाशित झाली असून त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.
- **'काळे करडे स्ट्रोक्स' ही कादंबरी 2000 सालानंतर जन्माला आलेल्या नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करते.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **-0.25**

**Question No : 53**
भारतीय तटरक्षक दलाने "..........." या नावाची केंद्रीकृत पेमेंट प्रणाली सुरु केली आहे

**Answer Options :**

✔ A] PADMA
✖ B] GANGA
✖ C] SURKSHA
✖ D] RAKSHAK

**Solutions :**

- **पे रोल ऑटोमेशन फॉर डिस्बिर्समेंट ऑफ मंथली अलाउंसेस (PADMA)** ,
- भारतीय तटरक्षक दलासाठी स्वयंचलित वेतन आणि भत्ते मॉड्यूलचे उद्घाटन संरक्षण मंत्रालयाच्या संरक्षण खात्यांचे नियंत्रक (CGDA) श्री रजनीश कुमार यांच्या हस्ते करण्यात आले.
- CGDA ने यावर भर दिला की सरकारने समर्पित सेवा सुनिश्चित करण्यासाठी आणि प्रत्येक स्तरावर मॅन्युअल हस्तक्षेप कमी करण्यासाठी आणि मोठ्या प्रमाणात ई-गव्हर्नन्सला प्रोत्साहन देण्यासाठी डिजिटल इंडियासाठी मोहीम चालवली आहे.
- PADMA लॉंच केल्याने डिजिटल इंडिया संकल्पना मजबूत होईल. तसेच, हा एक 'आत्मनिर्भर भारत' उपक्रम आहे कारण संपूर्ण मॉड्यूल भारतीय उद्योजकांनी डोमेन तज्ञांच्या सहाय्याने डिझाइन आणि विकसित केले आहे.

- **पद्मा बद्दल:**
  PADMA हे नवीनतम तंत्रज्ञानाचा लाभ घेणारे E2स्वयंचलित व्यासपीठ आहे जे सुमारे 15,000 भारतीय तटरक्षक कर्मचार्‍यांना अखंड आणि वेळेवर वेतन आणि भत्ते प्रदान करेल.

हे मॉड्युल संरक्षण लेखा विभागाच्या नियंत्रणाखाली विकसित केले गेले आहे आणि पे अकाउंट्स ऑफिस कोस्ट गार्ड, नोएडा द्वारे ऑपरेट केले जाईल.
केंद्रीकृत वेतन प्रणाली (CPS) ची सुरुवात या प्रक्षेपणामुळे झाली, ज्याचा पाया संरक्षण लेखा विभागाच्या मुख्यालयाद्वारे मंत्रालयाच्या अंतर्गत सर्व संस्थांसाठी एक स्टॉप पे अकाउंटिंग सोल्यूशन्स प्रदान करण्यासाठी घातला जात आहे.

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 54**
भारतात **'आयुष्मान भारत दिवस'** कधी साजरा केला जातो?

**Answer Options :**
✖ A] 25 एप्रिल
✔ B] 30 एप्रिल
✖ C] 1 मे
✖ D] 5 मे

**Solutions :**
- आयुष्मान भारत योजना, सरकारची प्रमुख आरोग्य सेवा योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 30 एप्रिल 2018 रोजी सुरू केली होती. तेव्हापासून, **30 एप्रिल हा दिवस देशभरात आयुष्मान भारत दिवस** म्हणून साजरा केला जातो.
- **ग्रामीण भागातील लोकांमध्ये आरोग्य सेवा योजनेबाबत जनजागृती करणे हा त्याचा उद्देश आहे.**
  ही योजना सार्वत्रिक आरोग्य कव्हरेजच्या धर्तीवर सुरू करण्यात आली होती, ज्याचा उद्देश UN SDG)3- 'सर्वांसाठी आरोग्य आणि कल्याण' पूर्ण करण्याच्या उद्देशाने आहे.
- भारताने 75,532 AB-आरोग्य आणि कल्याण केंद्रे (HCW) कार्यान्वित केली आहेत आणि डिसेंबर 2022 पर्यंत 1.5 लाख HWC कार्यान्वित करण्याच्या मार्गावर आहे.

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **-0.25**

**Question No : 55**
महिला सबलीकरणासाठी **मिशन शक्ती** ही योजना कोणत्या राज्याने सुरु केली.

**Answer Options :**
✖ A] गुजरात
✖ B] कर्नाटक
✔ C] उत्तरप्रदेश
✖ D] तामिळनाडू

**Solutions :**
- राज्यातील महिलासंबंधी होणारे गुन्हे या योजने द्वारे कमी होणार आहेत.
  याद्वारे महिला तक्रारदारांसाठी स्वतंत्र कक्ष निर्माण करण्यात येणार आहे.

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **1.00**

**Question No : 56**
**देय बँकाचे** कार्य कोणते आहे?

**Answer Options :**
✖ A] कर्ज देणे
✔ B] देणी भागविणे
✖ C] क्रेडिट कार्ड देणे
✖ D] वरीलपैकी सर्व

**Solutions :**
- देय बँक कर्ज देऊ शकत नाहीत. तसेच त्या क्रेडिट कार्डही देऊ शकत नाही त्यांचे कार्य केवळ देणी भागविणे एवढेच आहे.

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **-0.25**

**Question No : 57**

*खालील विधाने विचारात घ्या.*

a) राष्ट्रीय उत्पन्न म्हणजे एका आर्थिक वर्षात देशांतर्गत संस्थांनी कमावलेले उत्पन्न होय.
b) उत्पादन पद्धत (product method) ही अर्थव्यवस्थेतील क्षेत्रांचे तुलनात्मक महत्व प्रकट करते.
c) CSO संस्था भारताचे उत्पन्न मोजताना उत्पादन पद्धतींचाच वापर करते.
d) चालू किमतींमध्ये किंवा Nominal पद्धतीमध्ये एक मोठी त्रुटी असते, ती म्हणजे महागाईची,

वर दिलेल्या विधानांपैकी कोणते विधानाने **चुकीची** आहे/ आहेत?

**Answer Options :**
✖ A] फक्त a आणि d
✔ B] फक्त c
✖ C] फक्त a आणि c
✖ D] फक्त d

**Solutions :**
- **CSO संस्था भारताचे उत्पन्न मोजताना उत्पादन पद्धती व उत्पन्न पद्धतीचा या दोन्ही पद्धतींचा संयुक्तपणे वापर करते.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **1.00**

**Question No : 58**
भारतातील लोकसंख्येच्या वैशिष्ट्या संदर्भात कोणते विधान अचूक नाही?

**Answer Options :**
✔ A] भारतात ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणात शहरी लोकसंख्या अधिक प्रगल्भ आहे.
✖ B] भारतात स्त्रियांचे पुरुषांशी असलेले प्रमाण कमी आहे.
✖ C] लोकसंखेची घनता सर्व ठिकाणी एकसारखी नाही.
✖ D] दिवसेंदिवस लहान वयोगटातील व्यक्तीचे प्रमाण कमी होत जाऊन वृद्धांच्या प्रमाणात वाढ होणार आहे.

**Solutions :**
- **भारतात ग्रामीण लोकसंख्येच्या प्रमाणात शहरी लोकसंख्या अधिक प्रगल्भ आहे असे म्हणता येणार नाही.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **-0.25**

**Question No : 59**
**पॅरिटी म्हणजे काय ?**

**Answer Options :**
✔ A] गर्भवती स्त्रीयांची संख्या
✖ B] मातांची संख्या
✖ C] बालकांची संख्या
✖ D] लिंग असमानता मधील फरक

**Solutions :**
- पॅरिटी म्हणजे गर्भवती स्त्रीयांची संख्या

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **-0.25**

**Question No : 60**
*खालील विधाने विचारात घ्या.*

a) मध्यवर्ती बँकेने स्वस्त पैशाच्या धोरणाचा अवलंब केल्यास व्यापारी बँकांकडून पतचलन संकोच घडवून आणला जातो.
b) पहिल्या पंचवार्षिक योजनेत किंमतींचा निर्देशांक 31 टक्क्यांनी कमी झाला.
c) अर्थव्यवस्थेतील काळ्या पैशाने मागणी वाढून किंमती कमी होतात.

वर दिलेल्या विधाना विधानांपैकी **कोणते विधान बरोबर आहे / आहेत?**

**Answer Options :**
✖ A] वरील सर्व
✔ B] वरीलपैकी एकही नाही

✖ C] फक्त b आणि c ✖ D] फक्त b

**Solutions :**

- a) मध्यवर्ती बँकेने **स्वस्त पैशाच्या धोरणाचा अवलंब** केल्यास व्यापारी बँकांकडून पतचलन विस्तार घडवून आणला जातो.
  b) पहिल्या पंचवार्षिक योजनेत किंमतींचा निर्देशांका 13 टक्यांनी कमी झाला.
  c) अर्थव्यवस्थेतील काळ्या पैसाने मागणी वाढून किंमती वाढतात.

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **-0.25**

**Question No : 61**
भारतीय शेतीतील **हरित क्रांतीचे परिणाम** ओळखा.

a) कृषि उत्पादन व उत्पादकता वाढली,
b) हरित क्रांतीने आंतर पीक विषमता निर्माण केली.
c) शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न प्राप्त होऊ लागले.
d) प्रादेशिक व प्रदेशांतर्गत विषमता वाढली.

*पर्यायी उत्तरे:*

**Answer Options :**
✖ A] फक्त a आणि c ✖ B] फक्त a आणि d
✖ C] फक्त a, b आणि d ✔ D] a, b, c आणि d

**Solutions :**

- **भारतात नॉरमन बोरलॉग यांनी विकसित केलेल्या संकरित बियाण्यांवर आधारित हरित क्रांतीची सुरवात 1966-67 च्या खरीप हंगामात करण्यात आली हरित क्रांतीने देशाच्या कृषि अर्थव्यवस्थेत काही सकारात्मक तर काही नकारात्मक परिणाम निर्माण केले.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 62**
**केंद्रीय अर्थसंकल्प 2022-23** मध्ये विकासाला चालना देण्यासाठी पुढील पैकी कोणाला प्राधान्यक्रम देण्यात आला आहे ?

**Answer Options :**
✖ A] पीएम गतीशक्ती ✖ B] समावेशक विकास
✖ C] गुंतवणुकीसाठी वित्तपुरवठा ✔ D] वरीलपैकी सर्व

**Solutions :**

- **2022-23 च्या अर्थसंकल्पात पुढील चार प्राध्यान्य क्रमांसह विकासाला चालना देणारा आहे**
  **1) पीएम गतीशक्ती**
  **2) समावेशक विकास**
  **3) उत्पादकता वाढ**
  **4) गुंतवणुकीसाठी वित्तपुरवठा**

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **1.00**

**Question No : 63**
2011 च्या जनगणनेनुसार देशातील लोकसंख्येची एकूण साक्षरता-----आहे.

**Answer Options :**
✔ A] 74 टक्के ✖ B] 82 टक्के
✖ C] 64 टक्के ✖ D] 84 टक्के

**Solutions :**

- **2011 जनगणनेनुसार भारताची एकूण साक्षरता 74.04% आहे यात पुरुष साक्षरता 82.14% तर महिला साक्षरता 65.46% आहे.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **-0.25**

**Question No : 64**
खालीलपैकी भारताच्या **विनिमय दर व्यवस्थापनाची उदिष्टे आहे / आहेत ?**

a) विनिमय दरातील चढउतार कमी करणे.
b) परकीय चलन साठा कमाल (maximum) स्तरावर राखणे.
c) सट्टेबाजीमुळे निर्माण होणाऱ्या अस्थैर्यास आळा घालणे.
d) परकीय चलन बाजाराच्या विकासासाठी बाजार अडथळे दूर करणे.

**Answer Options :**
✖ A] वरीलपैकी एकही नाही
✖ B] वरीलपैकी सर्व
✔ C] फक्त a, c आणि d
✖ D] फक्त c आणि d

**Solutions :**
- **परकीय चलन साठा पर्याप्त स्तरावर ठेवणे.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 65**
ग्रामीण भागांतील लघु व सीमांत शेतकऱ्यांना, शेतमजुरांना, ग्रामीण व कुशल कामगारांना लघुमुदतीचे कर्ज देणे तसेच ग्रामीण अर्थव्यवस्थेला वित्तपुरवठा करण्यासाठी कोणत्या बँका निर्माण करण्यात आल्या?

**Answer Options :**
✖ A] रिझर्व बँक
✖ B] स्टेट बँक ऑफ इंडिया
✖ C] राष्ट्रीयकृत बँका
✔ D] प्रादेशिक ग्रामीण बँका

**Solutions :**
**1975 मध्ये नरसिंहन यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामीण बँकासाठीचा कार्यगट स्थापन करण्यात आला.**

**या कार्यगटाने ग्रामीण भागासाठी प्रादेशिक ग्रामीण बँका स्थापन करण्याची शिफारस केली.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 66**
ज्या गतीने अर्थव्यवस्था मंदीत शिरली, त्याच गतीने तिचे पुनरुत्थान होत असेल तर कोणत्या प्रकारचा आलेख निर्माण होईल ?

**Answer Options :**
✖ A] L- आकाराचा
✖ B] U - आकाराचा
✖ C] W - आकाराचा
✔ D] V - आकाराचा

**Solutions :**
- **V- आकाराचा आलेख निर्माण होईल, ही अवस्था कोविड-19 लाटेत लॉकडाऊन मध्ये व नंतर अनुभवली.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **1.00**

**Question No : 67**
स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने **ऑगस्ट 1949** मध्ये **राष्ट्रीय उत्पन्न समिती** कोणाच्या अध्यक्षतेखाली स्थापन केली होती?

**Answer Options :**
✖ A] प्रो. डी. आर. गाडगीळ
✖ B] डॉ. व्ही. के. आर. राव
✔ C] प्रो. पी.सी.महालनोबिस
✖ D] प्रो. रंगराजन

**Solutions :**

- प्रो. पी.सी.महालनोबिस यांच्या अध्यक्षतेखाली 1949 साली राष्ट्रीय उत्पन्न समिती स्थापन केली.
- प्रो. डी. आर. गाडगीळ  व डॉ. व्ही. के. आर. राव या समितीचे सदस्य होते.
- या समितीने राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याची निखळ उत्पादन पद्धत आणि निव्वळ उत्पन्न पद्धत सूचविली.

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **-0.25**

**Question No : 68**
विरळ लोकसंख्या, मर्यादित संपर्क सुविधा असलेल्या सीमावर्ती गावांच्या विकासासाठी कोणता कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे?

**Answer Options :**
✔ A] व्हायब्रट व्हिलेज
✖ B] डिव्हाईन व्हिलेज
✖ C] मॉडर्न   व्हिलेज
✖ D] रायझींग व्हिलेज

**Solutions :**

- विरळ लोकसंख्या, मर्यादित संपर्क सुविधा आणि उत्तर सीमेवरील पायाभूत सुविधा असलेल्या सीमावर्ती गावांच्या विकासासाठी व्हायब्रट व्हिलेज प्रोग्राम म्हणजेच चैतन्यमय गावे कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **-0.25**

**Question No : 69**
भारतातील कृषी निर्यात क्षेत्रांचे खालीलपैकी कोणते महत्वाचे उद्दिष्ट नाही?

**Answer Options :**
✖ A] कृषीचा बाजाराभिमुख दृष्टीकोन
✔ B] भारतीय शेतीचे राष्ट्रीयीकरण
✖ C] कृषि उत्पादनाची देशी व परदेशी बाजारपेठांमध्ये स्पर्धात्मकता वाढविणे.
✖ D] रोजगार निर्मिती

**Solutions :**

- 2001 च्या आयात-निर्यात धोरणात कृषी निर्यात क्षेत्रांची संकल्पना मांडली, विशिष्ट कृषी वस्तू व त्यांचे विशिष्ट भौगोलिक क्षेत्र यांच्यावर लक्ष केंद्रीत करून कृषी निर्यात वाढविणे उद्दिष्ट आहे तसेच भारतीय शेतीचे आंतरराष्ट्रीयकरण करणे उद्दिष्ट आहे.

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 70**
भारतात 2021-22 या वर्षासाठी परकीय कंपन्यापाठी महामंडळ कर (Corporate Tax) दरपातळी किती टक्के आहे?

**Answer Options :**
✖ A] 30 %
✖ B] 35%
✔ C] 40 %
✖ D] 20%

**Solutions :**

- 2021-22 या वर्षासाठी महामंडळ कर भारतीय कंपन्यांसाठी 30% तर परकीय कंपन्यांसाठी 40% आहे.

---

Status : **Attempted**

Option Selected : **1**
Status : **1.00**

**Question No : 71**
वसतिगृहातील विद्यार्थ्यांबाबत भाऊरावांनी खालीलपैकी कोणते नियम केले होते ?

a) विदयार्थी ज्ञानाची अभिलाषा धरणारा असावा.
b) विद्यार्थ्यांना स्वावलंबनाची आवड असावी.
c) विद्यार्थ्याने अस्पृश्यता मानता कामा नये.
d) विद्यार्थी चारित्र्यसंपन्न, सदगुणी असावा.

**Answer Options :**
✔ A] वरीलपैकी सर्व
✖ B] वरीलपैकी एकही नाही.
✖ C] फक्त b
✖ D] फक्त a, b आणि d

**Solutions :**
- भाऊराव पायगोंडा पाटील हे ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक होते.
- त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना 1919 ला केली.

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **1.00**

**Question No : 72**
दिनकरराव जवळकर यांनी पुढीलपैकी कोणते पुस्तक लिहिले नाही ?

**Answer Options :**
✔ A] माझ्या आठवणी व अनुभव
✖ B] देशाचे दुश्मन
✖ C] मर्द हो, नाके कापून घ्या.
✖ D] शेतकऱ्याचे हिंदुस्थान

**Solutions :**
- 'माझ्या आठवणी व अनुभव' हे वि.रा. शिंदे यांचे आत्मचरित्र आहे.

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 73**
केसर-ए-हिंद ही पदवी खालीलपैकी कोणात्या व्यक्तीस मिळालेली नव्हती?

**Answer Options :**
✖ A] महात्मा गांधी
✖ B] पंडिता रमाबाई
✖ C] रवींद्रनाथ टागोर
✔ D] महात्मा फुले

**Solutions :**
महात्मा जोतिबा फुले यांना कैसर-ए-हिंद ही पदवी मिळालेली नव्हती.

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **1.00**

**Question No : 74**
न्या. रानडे यांनी महाराष्ट्रात संस्थात्मक जीवनाचा पाया घातला त्यांनी कोणत्या संस्थांची स्थापना केली ?

a) वक्तृत्वोत्तेजक सभा
b) लवाद कोर्ट
c) औद्योगिक परिषद
d) वसंत व्याख्यानमाला

**Answer Options :**

✔ A] वरीलपैकी सर्व

✖ B] फक्त a आणि c

✖ C] फक्त a आणि d

✖ D] फक्त a, b आणि d

**Solutions :**

- सार्वजनिक सभा, वक्तृत्वोत्तेजक सभा, लवाद कोर्ट, औद्योगिक परिषद, फिमेल हायस्कूल, प्रार्थना समाज वसंत व्याख्यानमाला, मराठी ग्रंथोत्तेजक मंडळ, रे म्युझिम इत्यादी संस्था न्या. रानडे यांच्याशी संबंधीत आहेत.

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **-0.25**

**Question No : 75**

संयुक्त महाराष्ट्रात सामील होण्यासाठी 1953 साली 'नागपूर करार' झाला या करारावर खालीलपैकी **कोणी सही केली नव्हती?**

**Answer Options :**

✔ A] स्वामी रामानंद तीर्थ

✖ B] देवीसिंह चौहान

✖ C] भाऊसाहेब हिरे

✖ D] यशवंतराव चव्हाण

**Solutions :**

- 28 सप्टेंबर 1953 रोजी नागपूर करार झाला.
- देवीसिंह चौहान हे या बैठकीला हजर नव्हते, पण त्यांची स्वाक्षरी नंतर घेण्यात आली.
- स्वामी रामानंद तीर्थ यांनी चर्चेत भाग घेतला पण त्यांची करारावर सही नव्हती.

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **-0.25**

**Question No : 76**

1917 मधील चंपारण सत्याग्रहात गांधीजींच्या बरोबर कोणी **सहभाग घेतला नव्हता ?**

**Answer Options :**

✖ A] राजेंद्र प्रसाद

✔ B] सरदार पटेल

✖ C] महादेव देसाई

✖ D] जे. बी. कृपलानी.

**Solutions :**

- 1917 च्या चंपारण सत्याग्रहातील गांधीजींचे सहयोगी राजेंद्र प्रसाद, ब्रिजकिशोर प्रसाद, राजकुमार शुक्ला, महादेव देसाई, नरहरी पारिख, जे. बी. कृपलानी, राजकिशोर प्रसाद हे होते.

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 77**

बहुसंख्याक असा शेतकरी व कामगार वर्ग हा देशाचा खरा सत्ताधारी वर्ग बनला पाहिजे' असे कोण म्हटले होते?

**Answer Options :**

✖ A] श्रीपाद अमृत डांगे

✖ B] केशवराव

✔ C] डॉ. बी. आर. आंबेडकर

✖ D] वरीलपैकी नाही.

**Solutions :**

- 15 मे 1938 च्या देवरुख सभेत डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी म्हटल, बहुसंख्याक असा शेतकरी व कामगार वर्ग हा देशाचा खरा सत्ताधारी वर्ग बनला पाहिजे.

---

Status : **Attempted**
Option Selected : **1**
Status : **-0.25**

**Question No : 78**
डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेल्या 'बहिष्कृत भारत' या वृत्तपत्राच्या शीर्षभागी **कोणत्या संतांची वचने असत?**

**Answer Options :**
✖ A] संत तुकाराम
✔ B] संत ज्ञानेश्वर
✖ C] संत कबीर
✖ D] संत नामदेव

**Solutions :**
**बहिष्कृत भारत हे डॉ. आंबेडकर यांनी 3 एप्रिल 1927 रोजी सुरु केले. ते एक पाक्षिक होते. डॉ. आंबेडकर स्वतः या पाक्षिकाचे संपादक होते. दुसऱ्या अंकापासून 'बहिष्कृत भारत' वर बिरुदावली म्हणून ज्ञानेश्वरांची वचने असत.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **1.00**

**Question No : 79**
खालीलपैकी कोणते विधान **चुकीचे** आहे ?

**Answer Options :**
✖ A] होमरुल म्हणजे स्वराज्यप्राप्ती होय.
✔ B] होमरुल चळवळ ही मुळात फ्रान्स या देशात साम्राज्यवादी जोखडातून मुक्त होण्यासाठी केली.
✖ C] सप्टेंबर 1916 मध्ये अॅनी बेझंट यांनी 'होमरुल लीग' ची स्थापना केली.
✖ D] मद्रास प्रांतातील होमरुल लीगचे अध्यक्ष सर सुब्रम्हण्यम अय्यर होते.

**Solutions :**
- **होमरुल चळवळ ही मुळात आयर्लंड या देशातील लोकांनी ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी जोखडातून मुक्त होण्यासाठी केली होती.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **3**
Status : **-0.25**

**Question No : 80**
_________ यांनी टिळकांच्या मृत्युदिवशीच औरंगाबाद येथे बळवंत मोफत वाचनालय स्थापन केले.

**Answer Options :**
✔ A] आ. कृ. वाघमारे
✖ B] गोविंदभाई श्रॉफ
✖ C] स्वामी रामानंद तीर्थ
✖ D] काशीनाथराव वैदय

**Solutions :**
- **1920 नंतर हैदराबाद संस्थानात सामाजिक ,शैक्षिणक, भाषिक, साहित्यिक क्षेत्रात जागृतीचे बीजारोपण झाले.**
- **आ. कृ. वाघमारे यांनी टिळकांच्या मृत्यू दिवशीच औरंगाबाद येथे बलवंत मोफत वाचनालय स्थापन केले.**

---

Status : **Attempted**
Option Selected : **2**
Status : **1.00**

**Question No : 81**
पुढील विवरणावरून व्यक्ती ओळखा.

a) हायकोर्टाचे न्यायाधीश होते.
b) मुंबई विद्यापीठाचे पहिले भारतीय कुलगुरु
c) दादाजी विरुद्ध रखमाबाई खटल्यात त्यांनी रखमाबाईंची बाजू कोर्टात मांडली होती.
d) संमती वयाच्या बिलाचे ते कर्ते होते.

**Answer Options :**
✖ A] बद्रुद्दीन तय्यबजी
✔ B] काशीनाथ त्र्यंबक तेलंग
✖ C] दिनशा वाच्छा
✖ D] न्या. चंदावरकर

**Solutions :**

- काशीनाथ त्र्यंबक तेलंग - ते B.A., M.A. L.L.B. ,संस्कृत व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व, कायदेपंडीत ,सामाजिक सुधारणांच्या लढाईतील प्रत्येक आघाडीवर रानडेंचे सहयोगी होते.

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **-0.25**

**Question No : 82**
*पुढील विधाने विचारात घ्या.*

a) मुसलमानांच्या मोहरम सणावरून स्फूर्ती घेऊन टिळकांनी गणपती उत्सव सुरु केला.
b) नाशिकमधील नांदगावमध्ये भिल्लांनी ब्रिटिश सत्तेला त्रस्त करून सोडले होते.
c) नारायणराव टिळक यांनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला होता.
d) 'सेवासदन' ही संस्था प्रामुख्याने 'अस्पृश्यता निवारण' चे कार्य करणारी संस्था होती.

वरीलपैकी **कोणते / ती विधान / ने बरोबर आहेत ?**

**Answer Options :**
✖ A] फक्त a व b
✔ B] फक्त a, b व c
✖ C] फक्त b, c व d
✖ D] वरीलपैकी सर्व

**Solutions :**

- रमाबाई रानडे यांनी 1908 साली सेवा सदनची स्थापना केली.
- सेवासदन ही प्रामुख्याने स्त्री शिक्षण संस्था होती.

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 83**
जोड्या लावून **योग्य पर्याय** निवडा.

| **'A'** | **'B'** |
|---|---|
| a) कृष्णाजी रानडे | i) दीनमित्र |
| b) मुकुंदराव पाटील | ii) ज्ञानप्रकाश |
| c) विष्णुशास्त्री पंडित | iii) नेटिव्ह ओपिनियन |
| d) रावसाहेब मंडलिक | iv) इंदुप्रकाश |

**Answer Options :**
✖ A] a- i b-ii c-iii d-iv
✖ B] a-iv b-iii c-ii d-i
✔ C] a-ii b-i c-iv d-iii
✖ D] a-ii b-iii c-i d-iv

**Solutions :**
संपादक व वृत्तपत्रे -

- **कृष्णाजी रावडे - ज्ञानप्रकाश**
- **मुकुंदराव पाटील – दीनमित्र**
- **विष्णुशास्त्री पंडित - इंदुप्रकाश**
- **रावसाहेब मंडलिक - नेटिव्ह ओपिनियन**

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 84**
प्रतिसरकारच्या भूमिगत कार्यकर्त्यांनी पुढीलपैकी कोणत्या सामाजिक सुधारणांना चालना दिली ?

a) गांजाचा साठा नष्ट करणे
b) जत्रेच्या वेळी बोकड कापण्याचा प्रथा बंद करणे
c) गांधी पद्धतीने लग्न लावणे
d) खेडयात वाचनालये स्थापन करणे

**Answer Options :**

✖ A] फक्त c आणि d
✖ B] फक्त b , c आणि d
✖ C] फक्त c
✔ D] वरीलपैकी सर्व

**Solutions :**

- 1942 च्या चले जाव चळवळीत मुंबई प्रांतातील सातारा जिल्हात प्रतिसरकार स्थापन करण्यात आले.
- साताऱ्यातील प्रतिसरकार हे 1 जून 1943 पासून 13 जून 1946 पर्यंत म्हणजे तीन वर्षांहून अधिक काळ कार्यरत होते.

---

Status : **Attempted**
Option Selected : **4**
Status : **1.00**

**Question No : 85**
ऐतिहासिक घटनांचा **क्रम लावा**

a) खिलाफत चळवळ
b) सायमन कमिशनवर बहिष्कार
c) दांडी मार्च
d) क्रिप्स मिशन

**Answer Options :**

✖ A] b, a, d, c
✖ B] d, c, a, b
✖ C] d, c, b, a
✔ D] a, b, c, d

**Solutions :**

- खिलाफत चळवळ - 1920
- सायमन कमिशन बहिस्कार- 1927
- दांडी मार्च – 1930
- क्रिप्स मिशन - 1942

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 86**
दोन संख्या ह्या एका तिसऱ्या नंबरपेक्षा अनुक्रमे 20 टक्के आणि 50 टक्क्यांनी मोठ्या आहेत. तर त्या दोन संख्या प्रमाणात कशा प्रकारे मांडता येतील.

**Answer Options :**

✖ A] 2:5
✖ B] 3:5
✔ C] 4:5
✖ D] 6:7

**Solutions :**
समजा, ती तिसरी संख्या x आहे.
त्या दोन संख्या 1.2x आणि 1.50 असणार
Ratio = 1.2x/1.5x = 12/5 = 4/5

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 87**
एक वस्तूविक्रेता मुळ किंमतीपेक्षा 10 टक्क्यांनी जास्त किंमतीस वस्तू विकतो. परंतु नंतर वस्तूंची मागणी वाढल्यामुळे किंमतीमध्ये 15 टक्क्यांनी वाढ करतो. तर वस्तु विक्रेत्याला किती टक्के फायदा होईल.

**Answer Options :**

✖ A] 25
✔ B] 26.5
✖ C] 17.5
✖ D] 12

**Solutions :**

समजा वस्तूची मुळ किंमत 100 ₹ आहे.
10 टक्क्यांनी जास्त किंमत =110 रु
यावर परत 15 टक्के वाढ झाल्यावर वस्तूची किंमत 110 = 115/100 = 126.5 रु
त्यामुळे एकूण फायदा 126.5 - 100 = 26.5 ₹
फायदा टक्क्यांमध्ये = 26.5 / 100 X 100 = 26.5 टक्के

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 88**

एका संख्येला पहिल्यांदा 10 टक्यांनी कमी केले आणि नंतर 10 टक्यांनी वाढवले. यानंतर जी संख्या मिळाली ती मुळ संख्येपेक्षा 10 ने लहान होती, तर मुळ संख्या कोणती ?

**Answer Options :**

✔ A] 1000
✖ B] 1050
✖ C] 1500
✖ D] 2000

**Solutions :**

समजा मुळ संख्या 100 आहे.
10 टक्क्यांनी कमी केल्यावर येणारी संख्या = 90
आता, 10 टक्क्यांची वाढ झाल्यावर येणारी संख्या = 90 + 99 X 10 / 100 = 99
इथे मुळ संख्या आणि वाढ केल्यावर येणारी संख्या यातील
फरक = 100 - 99= 1 -------------- (I)
परंतु प्रश्नामध्ये हा फरक 10 चा आहे. त्यामुळे
समीकरण (I) ला 10 ने गुणू
1000 - 990 = 10
यावरुन दिसते की मुळ संख्या 1000 आहे.

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 89**

एका संग्रहालयला प्रत्येक रविवारी 510 पर्यटक भेट देतात तर आठवड्यातील उरलेल्या प्रत्येक दिवशी 240 पर्यटक भेट देतात. तर रविवारपासून सुरु असणाऱ्या 30 दिवसांच्या महिन्यात, दरदवशी किती पर्यटक सरासरी संग्रहालयाला भेट देतात.

**Answer Options :**

✖ A] 250
✖ B] 175
✖ C] 280
✔ D] 285

**Solutions :**

दिलेल्या माहितीवरून त्या महिन्यात 5 रविवार आणि उरलेले इतर 25 वेगळे वार असतात.
रविवारी भेट देणारे, एकूण पर्यटक - एकूण = 5 x 510 = 2550
उरलेल्या 25 दिवशी भेट देणारे प्रकूण पर्यटक = 25 x 290 = 6000
यावरुन, 30 दिवसांत भेट देणारे प्रकूण पर्यटक = 2550 + 6000
= 8550
म्हणून दरदिवशी सरासरी भेट देणारे पर्यटक = 8550 / 30 =285

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 90**

Q हा वयाने R पेक्षा जेवढा लहान आहे तेवढाच तो T पेक्षा मोठा आहे. जर R आणि T यांच्या वयांची बेरीज 60 असेल तर R आणि Q यांच्या दोघांच्या वयातील फरक किती असेल?

**Answer Options :**

✖ A] 1 वर्षे
✖ B] 2 वर्षे

✖ C] 25 वर्षे

✔ D] वरीलपैकी कोणतेही नाही

**Solutions :**

दिलेल्या माहितीवरून T – Q - R

जर Q चे वय x मानले तर  T – Q – R = x/2 x 3/2x

तसेच R +T = 60 3/2x + x/2 = 60

X = 30

आता R – Q = 3 / 2 x - x = x/2

R - Q = 15

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 91**

एक 800 मीटर लांबीची रेल्वे ताशी 78 किमी या वेगाने प्रवास करत आहे. जर या रेल्वेने एका बोगद्याला 1 मिनिटामध्ये पार केले तर बोगद्याची लांबी किती असेल ?

**Answer Options :**

✖ A] 130 मी

✖ B] 360 मी

✔ C] 500 मी

✖ D] 540 मी

**Solutions :**

रेल्वे लांबी = 800 मी, वेग = 78 किमी / तास  1 मिनिट = 60 से

= 78 x 5 /18 65/3 मी/से

समजा, बोगद्याची लांबी = x

वेळ = एकूण अंतर / वेग = 800 + X / 65/3 = 60

800 + X= 60 x 65/ 3

X = 500

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 92**

एका सांकेतिक भाषेत PORCELAIN हा शब्द QOSCELBJO असा लिहिला जातो. तर त्याच भाषेत BKMOUSPP कशा प्रकारे लिहिला जाईल ?

**Answer Options :**

✖ A] AUTOLROPY

✔ B] ALLOTROPY

✖ C] ALOTROLPY

✖ D] ATLOROPLY

**Solutions :**

विषय क्रमांकांवर असणाऱ्या जागेवर त्यापुढचा वर्ण तर सम संख्येवर तो बदलत नाही.

A L L O T R O P Y

B L M O U R P P 3

(खालील पर्यायांपेकी कोणता शब्द हा BLMOURPP3 असा लिहिला जाईल)

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 93**

खालील टेबल अभ्यासून योग्य पर्याय निवडा.

| | | |
|---|---|---|
| 9 | A | 12 |
| B | 10 | 7 |
| 8 | C | 11 |

**Answer Options :**

✖ A] A = B, B = 11, C = 9

✔ B] A = 13, B = 9, C = 11

✖ C] A = 9, B = 11, C = 13

✖ D] A = 9, 8 = 13, C = 1

**Solutions :**

ROW आणि coloum मधील संख्यांची बेरीज 30 होते.

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 94**

विधान आणि त्याद्वारा निष्कर्षाबाबत खालील विधाने लक्षात घ्या.

***विधान :*** एका क्रिकेटच्या सामन्यात, एका संघाने एकूण 200 धावांचा विक्रम केला. यांपैकी 160 धावा या गोलंदांजानी केला.
***निष्कर्ष :*** I संघामध्ये 80 टक्के पेक्षा जास्त गोलंदाज आहेत
II संघातर्फे खेळाणारा सलामीवर (opening batsman) हा सुध्दा गोलदांज होता.

**Answer Options :**

✖ A] निष्कर्ष I बरोबर

✖ B] निष्कर्ष II बरोबर

✖ C] निष्कर्ष I & II बरोबर

✔ D] निष्कर्ष I & II दोन्ही बरोबर नाहीत

**Solutions :**

धावांचा विक्रम कोणताही खेळाडू करू शकतो. फक्त फलदांज किंवा गोलदांज असावा असे नाही. त्यामुळे दोन्ही निष्कर्ष अयोग्य.

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 95**

विधाने आणि तर्क अनुषंगाने खालील वाक्ये विचारात घ्या

***विधान :*** उमेदवार निवडीसाठी परीक्षा पद्धत वर्णनात्मक पेक्षा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी असावी का.
***तर्क :*** I) हो. वस्तुनिष्ठ पद्धतीमध्ये उत्तरांचे मुल्यांकन हे तंतोतंत होते.
II) नाही. वर्णनात्मक पध्दती ही नक्कीच वस्तुनिष्ठ पद्धतीपेक्षा चांगली पद्धत आहे.

**Answer Options :**

✔ A] तर्क I मजबूत आहे

✖ B] तर्क II मजबूत आहे.

✖ C] दोन्ही तर्क मजबूत आहेत

✖ D] कोणताही तर्क मजबूत नाही.

**Solutions :**

तर्क I योग्यरीतीने बाजू मांडते.

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 96**

काही मोती रत्ने आहेत
काही रत्ने दागिने आहे.

**निष्कर्ष :**

I. काही रत्ने मोती आहेत
II. काही दागिने रत्ने आहेत

**Answer Options :**


✖ A] निष्कर्ष I योग्य

✖ B] निष्कर्ष II योग्य

✖ C] दोन्ही निष्कर्ष योग्य

✔ D] दोन्ही निष्कर्ष अयोग्य


**Solutions :**
या ठिकाणी दोन्ही premises/ विधाने विशिष्ट असल्याने, कोणताही निष्कर्ष योग्य ठरत नाही.




---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 97**
खाली दर्शवलेला pie-chart आकृती एका पुस्तक प्रकाशक कंपनीला आलेला खर्च टक्यांमध्ये दर्शविते. आकृतीवरून प्रश्नांची उत्तरे द्या.
कोणते दोन खर्च मिळून केंद्रीय कोन 108° चा तयार करतील




**Answer Options :**
✔ A] बायडिंग किंमत आणि जाहिरात
✖ B] प्रिंटिंग किंमत आणि पेपर किंमत
✖ C] रॉयल्टी आणि जाहिरात
✖ D] बायडिंग किंमत आणि पेपर किंमत

**Solutions :**
108 चा केंद्रीय कोन हा (108 X 100 / 360 = 30% खर्च दर्शवितो.

आकृतीवरून लक्षात येते की, बायडिंग किंमत + वाहतुक

= 20% + 10% = 30%

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 98**
जर एका त्रिकोणाची प्रत्येक बाजू दुप्पट केली तर नवीन तयार होणाऱ्या त्रिकोणाचे क्षेत्रफळ हे जुन्या त्रिकोणाच्या क्षेत्रफळाच्या K पट होते. तर या K ची किंमत किती ?

**Answer Options :**
✖ A] √2
✖ B] 2
✖ C] 3
✔ D] 4

**Solutions :**
त्रिकोणाचे क्षेत्रफळ = ½ x लांबी x रुंदी
नवीन त्रिकोणाचे क्षेत्रफळ = ½x (2 लांबी) x (2 रुंदी)
= ½x लांबी x रुंदी x 2 x 2

= 4 x मुळ त्रिकोणाचे क्षेत्रफळ

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 99**
मुलांचा एक संघ एक काम 40 दिवसांत पूर्ण करतो. जर त्या संघात अजून 10 मुले समाविष्ट असती तर, कार्य पूर्णतेसाठी अजून 5 दिवस कमी लागले असते. तर या संघात सध्या किती मुले आहे.

**Answer Options :**
✖ A] 45
✔ B] 70
✖ C] 65
✖ D] 50

**Solutions :**
संघामध्ये एकूण असणारे मुले = अतिरिक्त लागणारे मुले X दुसया संघाला एकूण लागणारा वेळ / कामासाठी लागणारे कमी दिवस
= 10 x 35 / 5 = 70

---

Status : **Not Attempted**
Option Selected : **-**
Status : **0.00**

**Question No : 100**
दोन वेगवेगळ्या बँकेत 2 वर्षासाठी ठेवलेल्या 5000 रुपयांच्या रकमेवर मिळणाऱ्या सरळव्याजातील फरक 25 रुपये आहे. तर त्या बँकातील व्याजदराचा फरक किती?

**Answer Options :**
✖ A] 0.03
✖ B] 0.02
✖ C] 0.005
✔ D] 0.0025

**Solutions :**
मुद्दल = व्याजातील फरक X 100 / वेळ x व्याजदरातील फरक
5000 = 25 x 100 / 2 × x
x = 0.25%